नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ५ Issue - 5 | वार गुरुवार दि. २२ मे २०२५ Blow- Thursday Date 22 May 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# सुरक्षा दलांसोबत झालेल्या चकमकीत २७ माओवादी ठार

## माओवाद्यांचा कणा मोडला, बस्तरमध्ये म्होरक्या बसवराजू ठार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नारायणपूर : छत्तीसगडच्या बस्तर भागात सुरक्षा दलांसोबत झालेल्या चकमकीत सुमारे २७ माओवादी ठार झाले, अशी माहिती अधिकाऱ्यांनी बुधवारी दिली. त्यात माओवाद्यांचा म्होरक्या नंबाला केशव राव उर्फ बसवराजू याचाही समावेश आहे, असे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी जाहीर केले. दरम्यान, या चकमकीत राज्य पोलिस दलाची शाखा असलेल्या जिल्हा राखीव रक्षकचा (डीआरजी) एक जवान हुतात्मा झाला असून, अन्य काही जण जखमी झाले आहेत.

'माओवाद्यांविरोधातील भारताच्या तीन दशकांच्या लढाईत सुरक्षा दलांनी सरचिटणीसस्तरावरील नेत्याला ठार करण्याची ही पहिलीच घटना आहे,' असे अमित शहा यांनी अध–रेखित केले. तर 'चकमकीदरम्यान माओवाद्यांचा म्होरक्या मारला गेल्याने सुरक्षा दलांना ऐतिहासिक यश मिळाले आहे,' असे एका वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याने नमूद केले. मात्र, त्यांनी अधिक तपशील दिला नाही.

बसवराजू हा प्रतिबंधित भारतीय कम्युनिस्ट पक्षाचा (माओवादी) सरचिटणीस होता. माओवाद्यांच्या केंद्रीय समितीने बसवराजू याला सरचिटणीसपदी नेमल्याचे निवेदन माओवाद्यांनी नोव्हेंबर २०१८मध्ये प्रसृत केले होते. गणपती याच्या स्थ–ानी बसवराजूची नियुक्ती झाली होती. त्याच्यावर दीड कोटीचे बक्षीस जाहीर करण्यात आले होते.

नारायणपूर-विजापूर-दंतेवाडा जिल्ह्यांच्या सीमावर्ती क्षेत्रातील अबूझमाडच्या घनदाट जंगलात ही चकमक झाली, असे वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याने सांगितले. माओवाद्यांची केंद्रीय समिती, पॉलिटब्युरो सदस्य, माड विभाग, पीपल्स लिबरेशन गुरिल्ला आर्मीचे वरिष्ठ सदस्य तिथे असल्याची माहिती गुप्तचर यंत्रणांकडून सुरक्षा यंत्रणेला मिळाली होती. त्या आध–ारावर नारायणपूर, दंतेवाडा, विजा–पूर, कोंडागावच्या डीआरजीच्या संयुक्त दलांनी मोहीम हाती घेतली. माओवाद्यांनी सुरक्षा दलांवर गोळीबार सुरू केला. यानंतर सुरक्षा दलांनीही प्रत्युत्तरादाखल कारवाई केली. आत्तापर्यंत २७ माओवाद्यांचे मृतदेह आणि मोठ्या प्रमाणात शस्त्रसाठा हस्तगत करण्यात आला आहे. गेल्या अनेक दिवसांपासून सुरू असलेल्या मोहिमेदरम्यान अनेक वरिष्ठ स्तरावरील माओवादी मारले गेल्याचा किंवा गंभीररित्या जखमी झाल्याचा अंदाज आहे. 'या चकमकीत सुरक्षा दलांनी वरिष्ठ स्तरावरील अनेक माओवाद्यांना ठार केले,' असे छत्तीसगडचे उपमुख्यमंत्री विजय शर्मा यांनी नमूद केले.

यावर्षी छत्तीसगडमध्ये आत्तापर्यंत झालेल्या विविध चकमकींत सुमारे २०० माओवादी मारले गेले. यातील १८३ जण बस्तर भागात मारले गेले. या विभागात विजापूर, नारायणपूर, दंतेवाडा आणि कोंडागावसह सात जिल्ह्यांचा समावेश होतो.

चार महिन्यापूर्वी बसवराजूच्या सुरक्षेशी संबंधित असलेल्या चार माओवाद्यांनी आत्मसमर्पण केले होते. तेव्हापासूनच सुरक्षा दले त्याच्या मागावर होत्या. माओवाद्यांचा आणखी एक मोठा नेता गणपती आणि बसव्राजू या दोघांच्याही सुरक्षेसाठी ४० जणांचा समावेश अस–लेली एक कंपनी तसेच सात ते आठ माओवाद्यांचे एक वैयक्तिक सुरक्षाप–थक सदैव तैनात असते. या व्यतिरिक्त आणखी एक बाह्य सुरक्षाकडे या दोघांच्या संरक्षणासाठी असते. या दोघांची त्रिस्तरीय सुरक्षा कशी असते, ते कशा पद्धतीने प्रवास करतात, त्यांचे वास्तव्य कोणत्या ठिकाणी अधिक असते, या सर्व गोष्टींचा अभ्यास नारायणपूर पोलिसांनी केला आणि ही सुरक्षा भेदली.



## मान्सूनची दमदार आगेकूच! मुंबईतही कोसळधार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई: हवामान विभागाच्या अधिकारी शुभांगी भुते यांनी सांगितले की, अरबी समुद्रात चक्राकार वाऱ्याचे क्षेत्र तयार होत आहे. यामुळे गुरुवारी कमी दाबाचे क्षेत्र तयार होईल. त्याचा परिणाम महाराष्ट्रात दिसून येईल. मुंबई, दक्षिण कोकण आणि दक्षिण मध्य महाराष्ट्रात गडगडाटी वादळांसहित मुसळ–धार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. या दरम्यान वाऱ्यांचा वेग ताशी ३० ते ४० किलोमीटर असू शकतो. दरम्यान, काल रात्री मुंबई शहर-उपनगरात आणि आसपासच्या परिसरात तुफान पाऊस झाला. भारतीय हवामानशास्त्र विभागाने (खचऊ) म्हटले आहे की, मान्सून वेगाने पुढे सरकत आहे. या आठवड्याच्या अखेरीस मान्सून केरळमध्ये दाखल होईल. केरळ, तामि ळनाडू आणि ईशान्येकडील राज्यांम ध्येही मान्सूनचे आगमन होऊ शकते. यादरम्यान, मुंबईसह महाराष्ट्रातील काही भागांत मुसळधार पावसाची शक्यता आहे. आयएमडीच्या मते, नैऋत्य आणि ईशान्य दोन्ही शाखांच्या जलद प्रगतीमुळे मान्सूनसाठी अनुकूल वातावरण तयार होत आहे. पुढील चार ते पाच दिवसांत, मान्सून दक्षिण अरबी समुद्राच्या काही भागात, मालदीव आणि कोमोरिनच्या उर्वरित भागात, लक्षद्वीपच्या काही भागात, केरळ, तामिळनाडू, बंगालच्या उपसागराच्या दक्षिण आणि मध्य भागात, बंगालच्या उपसागराच्या ईशान्य भागात आणि ईशान्य राज्यांमध्ये प्रवेश करण्याची शक्यता आहे.



गुरुवारी-शुक्रवारी ऑरेंज अलर्ट

पुणे घाट परिसरात गुरुवारी आणि शुक्रवारी ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. गुरुवारी कोल्हापूर आणि सातारा घाट परिसरात ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. रत्नागिरीमध्ये आजपासून शुक्रवारपर्यंत ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. गुरुवारी आणि शनिवारी सिंधुदुर्गात ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. गुरुवारी रायगडमध्येही ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. महाराष्ट्रात गेल्या काहि दिवसांपासून अवकाळीने धुमाकूळ घा–तला आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे अवकाळी पावसामुळे मोठे नुकसान झाले आहे. पुणे शहरात दहा वर्षातील सर्वाधिक पावसाची नोंद झाली आहे. १ मे ते २१ मे या कालावधीत ११० मिलिमीटर पा–वसाची नोंद करण्यात आली आहे. यापूर्वी २०१५ मध्ये १०६ मिलिमीटर पावसाची नोंद करण्यात आली होती. पुढचे दोन दिवस आणखी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागने वर्तवली आहे.

## नॅशनल हेरल्डमध्ये ९८८ कोटींचा गैरव्यवहार, ईडीचा आरोप; २ जुलैपासून होणार सुनावणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली: संरक्षण, निवडणुकीत उमेदवारी आणि पक्षात पदे मि ळवण्यासाठी काँग्रेस पक्षातील काही वरिष्ठ नेत्यांच्या सूचनेवरून ९८८ कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाला, असा आरोप सक्तवसुली संचलनालयाने (ईडी) नॅशनल हेराल्ड प्रकरणात केला आहे.

या प्रकरणात काँग्रेस नेत्या सोनिया गांधी आणि राहुल गांधी हे आर–ोपी आहेत. या प्रकरणावर आता २ जुलैपासून सुनावणी सुरू होणार आहे. 'ईडी'ने काँग्रेस नेत्या सोनिया गांधी, राहुल गांधी आणि इतरांविरोधात मनी लाँडरिंग प्रतिबंधक कायद्याच्या अंतर्गत आरोपपत्र दाखल केले आहे. या प्रकरणात विविध माध्यमांतून ९८८ कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचा आरोप 'ईडी'ने केला आहे. असोसिएटेड जर्नल्स लिमिटेडच्या दोन हजार कोटी रुपयांहून अधिक किमतीच्या मालमत्ता अवैधरीत्या ताब्यात घेतल्याप्रकरणी राहुल गांधी, काँग्रेसचे दिवंगत नेते मोतीलाल व्होरा आणि ऑस्कर फर्नांडिस यांच्यासह सॅम पित्रोदा आणि 'यंग इंडियन' या खासगी कंपनीवर कट रचल्याचा आरोप आहे.

यंग इंडियनला मिळालेली देयके देणग्यांच्या स्वरूपात नसून आरोपींच्या गुन्हेगारी कटाचा एक भाग म्हणून आणि मनी लाँडरिंगशी संबंधित कृत्ये सुरू ठेवण्यासाठी मिळाली आहेत. काही देणगीदारांचे कुटुंबीय किंवा नातेवाइकांनी एक तर काँग्रेस पक्षाच्या तिकिटावर निवडणूक लढवली किंवा त्यांना काही राजकीय पदांचे आश्वासन देण्यात आले, असे तपासात निष्पन्न झाल्याचे ईडीने म्हटले आहे.

कर्नाटकच्या गृहमंत्र्यांवर छापे

कर्नाटकचे गृहमंत्री जी. परम ेश्वर यांच्याशी संबंधित ठिकाणांवर सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) बुधवारी छापे टाकले. कोणत्या प्रकरणात ही कारवाई करण्यात आली, हे स्पष्ट झालेले नाही.

## वादळाच्या तडाख्यात सापडले २२७ प्रवाशांचं विमान, हवेतच हेलकावे, श्रीनगरमध्ये इमर्जन्सी लँडिंग

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

श्रीनगर : राज्यातील बहुतांश भागात मुसळधार पाऊस सुरू असून राजधानी दिल्लीतही वातावरण फिरलंय. कारण, मान्सूनपूर्व पावसाच्या हजेरीने हवाई वाहतुकीवरही परिणाम झाला आहे. त्यातच, आज दिल्लीतून श्रीनगरला जाण–ारे विमान वादळी वाऱ्याच्या चपाट्यात आल्याने श्रीनगर विमानतळावर या विम ानाचे इमर्जन्सी लँडिंग करण्यात आले. त्यामुळे, या विमानातून प्रवास करणाऱ्या २२७ प्रवाशांची जीव भांड्यात पडला. विमान प्रवासी वाहतुकीत विमान कंपन्या आणि शासनाच्या उड्डाण मंत्रालयाकडून विशेष काळजी घेतली जाते. त्यात, पावसाळ्याच्या दिवसांत विमान कंपन्यांना व विमानसेवेला महत्त्वाचे संदेशही सातत्याने दिले जातात. त्यामुळेच, दिल्ली-श्रीनगर विमान प्रवासात सुदैवाने मोठी दुर्घटना टळली. इंडिगोच्या या विमानातील सर्वच २२७ प्रवासी सुखरुप असल्याचे विमान कंपनीकडून सांगण्यात आले आहे. इंडिगो विमानच्या या उड्डाणाचे ट्रॅकिंग पाहिल्यास हे विमान वादळात सैरभैर झाल्याचं दिसून येत आहे. आकाशातील वादळात विमान गोल गोल फिरत असल्याचे लक्षात येताच विमानातील क्रु मेंबर आणि पायलटच्या प्रसंगावधानतेम ुळे विमानाचे इमर्जन्सी लँडिंग करण्यात आले. एअरपोर्ट अधिकाऱ्यांच्या म्हणण्यांनुसार, विमानाचे इमर्जन्सी लँडिग करताना कुठलाही अनुचित प्रकार घडला नाही, तसेच सर्व सूचना व मानकांचे पालन करण्यात आले आहे. दिल्ली ते श्रीनगर हवाई मार्गावर विमानाचा प्रवास सुरू असताना, बर्फाचा पाऊस आणि गारा पडत होत्या. त्यामध्ये, विमानाच्या पुढील बाजुच्या काही भागाचे नुकसान झाले आहे. विमान आकाशात हेलकावे घेत असताना प्रवाशांची धाकधूक वाढली होती, तर काही प्रवाशांनी आरडाओरडही सुरू केली. मात्र, फ्लाईट पायलट आणि केब्रिन क्रू मेंबर्सने सर्वच सूचना व नियम ांचे पालन करत विमानाचे इमर्जन्सी लँडिंग केले. त्यामुळे, सर्व प्रवाशांसह विमानाचे सुखरुप लँडिंग झाले आहे.

### स्टार्टअप क्षेत्रात भारताची झेप, लहान शहरांमधून उदय - केंद्रीय राज्यमंत्री डॉ.जितेंद्र सिंग

### 'स्टार्टअप कॉन्क्लेव २०२५' चे उद्घाटन

# महाराष्ट्र ही देशाची स्टार्टअप राजधानी : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : गुंतवणूक आणि स्टार्टअप्सच्या संख्येच्या बाबतीत महाराष्ट्र देशात आघाडीवर आहे. राज्य सरकारने स्टार्टअपसाठीची इको सिस्टिम उभी करण्यासाठी १२० कोटी रुपयांचा 'फंड ऑफ फंड्स' तयार केला आहे, ज्याद्वारे आर्थिक सक्षम आणि विक्रीयोग्य स्टार्टअप्सना आर्थिक मदत दिली जात असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

'सीएसआयआर' आणि तीन प्रम ुख वैज्ञानिक संस्थांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित स्टार्टअप कॉन्क्लेव २०२५ चे उद्धाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते गोरेगाव येथील नेस्को सेंटर येथे करण्यात आले. यावेळी केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान राज्यमंत्री डॉ.जितेंद्र सिंग, कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्री मंगल प्रभात लोढा, 'एनआयओ'चे संचालक प्रा.सुनील कुमार सिंह, 'एनसीएल'चे संचालक डॉ.आशीष लेले, 'नीरी'चे संचालक आणि डॉ.एस. वेंकट मोहन, स्टार्टअप उद्योजक, विद्यार्थी आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्राला समृद्ध सम ुद्रकिनारा लाभला असून येथे सागरी अर्थव्यवस्थेसाठी अफाट शक्यता आहेत. या आधारे हजारो स्टार्टअप्स उभे राहून नवीन व्यवसाय संधी निर्माण होऊ शकतात. त्याचबरोबर, किनारपट्टीची स्वच्छता कशी राखता येईल, मरीन इकॉनॉमीमध्ये शाश्वत–ता कशी आणता येईल, या प्रत्येक गोष्टीसाठी नाविन्यपूर्ण विचार आणि उपायांची गरज असून 'स्टार्टअप'साठी ही एक मोठी संधी आहे. आज मरीन रोबोटिक्ससारख्या नवकल्पनांवर भर दिला जात आहे, जे अत्यंत महत्त्वाचे आहे.

अनेक संस्था सॉलिड आणि लिक्विड वेस्ट मॅनेजमेंटमध्ये सतत नवे प्रयोग करत आहेत. समुद्र, नद्या किंवा नाले यामधील प्रदूषणाचा बहुतांश भाग हा औद्योगिक नसून, जास्तीत जास्त प्रदूषण अन्य तयार होणाऱ्या कचऱ्यामुळे होते. जर आपण शाश्वत तंत्रज्ञानाच्या साहाय्याने या कचऱ्यावर योग्य प्रक्रिया करू शकलो, तर पू–र्वीप्रमाणेच आपले जलस्रोत स्वच्छ ठेवणे शक्य होईल. म्हणूनच या संपूर्ण क्षेत्रात नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान आणि स्टार्ट-अप्सची अत्यंत गरज आहे.

आज भारतातील स्टार्टअप इकोसिस्टम जगा–तील सर्वात वेगाने वाढणाऱ्या इकोसिस्टिमपैकी एक आहे. चीननंतर भारतात सर्वाधिक स्टार्टअप्स उदयाला आले असून, भविष्यात भारत जगा–तील सर्वात मोठी स्टार्टअप शक्ती बनेल. नवी मुंबईत ३०० एकरमध्ये देशातील सर्वात आधुनिक 'इनोव्हेशन सिटी' उभारण्याचे काम सुरू आहे. येथे विज्ञान, तंत्रज्ञान, जैव तंत्रज्ञान, डेटा सायन्स आणि ॲडव्हान्स मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्रातील स्टार्टअप्सना इनक्यूबेट केले जाणार आहे. यासोबतच जागतिक दर्जाच्या १२ विद्यापीठांचे कॅंम्पस असलेली 'एज्यु-सिटी' देखील उभारली जाणार असून, त्यात एक लाख विद्यार्थी शिक्षण घेतील.




मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी सर्क्युलर इकॉनॉमीचा विशेष उल्लेख करत सांगितले की, कृषी क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर स्टार्टअप्स उदयास येत आहेत. महाराष्ट्राला देशाच्या स्टार्टअप क्रांतीत अग्रणी बनवण्याचा संकल्प आहे. केंद्र आणि राज्य सरकारच्या संयुक्त प्रयत्नातून आपण शिक्षण व इनोव्हेशन क्षेत्रात नेतृत्व करणार असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

भारत सरकारने स्टार्टअप संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी नवे मार्ग आखले आहेत. लहान शहरांमधून येणाऱ्या स्टार्टअप्सचा मोठा वाटा लक्षात घेता, सरकारच्या विविध योजनांचा फायदा सर्वांनी घ्यावा, असे केंद्रीय राज्यमंत्री डॉ.जितेंद्र सिंग यांनी सांगितले.

मागील १० वर्षांत भारत 'फ्रॅजाइल फाइव्ह' देशांमधून बाहेर येत थेट 'टॉप फाइव्ह' अर्थव्यवस्थांमध्ये पोहोचला आहे. ग्लोबल इनोव्हेशन इंडेक्समध्ये भारताने ८१व्या क्रमांकावरून थेट ३९व्या क्रमांकावर झेप घेतली आहे. देशभरात सुमारे २.५ लाख स्टार्टअप्स सक्रिय असून, यापैकी ४९ टक्के सूरत, अहमदाबाद, अमृतसर, चंदीगड अशा लहान शहरांतून उदयास आले आहेत.

सध्या देशात ६४,४८० पेटंट्स फाइल झाले आहेत, ज्यापैकी ५६ टक्के पेटंट्स हे भारतातच शिक्षण घेतलेल्या, येथेच काम करणाऱ्या भारतीयांनी दाखल केले आहेत. ही बदलती मानसिकता आणि संधींचा विस्तार भारताला आत्मनिर्भर बनवत आहे. यासाठी सरकारने अनेक योजना सुरू केल्या आहेत. निधी योजना, नॅशनल इनिशिएटिव्ह फॉर डेवलपमेंट ॲंड हार्नेसिंग इनोव्हेशन (छखउऋख) अशा उपक्रमांतून आर्थिक, तांत्रिक व मार्गदर्शन साहाय्य दिले जात आहे. विशेष म्हणजे आता वयोवृद्ध व दिव्यांग नागरिकांसाठीही स्टार्टअप संधी उपलब्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

जैव तंत्रज्ञान, समुद्र आधारित संसाधने (चरीळपश डींर्ीीिि), कृषी तंत्रज्ञान (सीळ-ढशलह) यांसारख्या नव्या क्षेत्रांतून पुढील २५ वर्षांत भारताच्या अर्थव्यवस्थेची वाढ अपेक्षित आहे. कृषी क्षेत्राचा जीडीपी वरील वाटा सध्या ३०-४० टक्के असून तो वाढविण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर गरजेचा आहे. युवा पिढीने स्टार्टअप क्षेत्रात सक्रिय सहभाग घ्यावा, आणि 'विकसित भारत २०४७' या स्वप्नपूर्तीसाठी आपली जबाबदारी स्वीकारावी, असे आवाहन केंद्रीय राज्यमंत्री डॉ.सिंग यांनीं केले.

नवीन स्टार्टअप धोरण तयार करण्याचा निर्णय - कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा

आज महाराष्ट्रात देशातील सर्वाधिक स्टार्टअप्स आहेत. पण येणाऱ्या काळात ही चळवळ शहरातून गावापर्यंत पोहोचली पाहिजे. स्टार्टअप ही केवळ तंत्रज्ञानापुरती मर्यादित न राहता, ग्रामीण भागातील समस्या सोडवणारी शक्ती बनली पाहिजे. त्याचबरोबर नवीन स्टार्टअप धोरण तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हे धोरण केवळ शहरी भागाप–ुरते मर्यादित न ठेवता, गावखेड्यांपर्यंत पोहोचवण्याचा शासनाचा प्रयत्न असेल. स्टार्टअप क्षेत्र जन चळवळ बनावी, यासाठी हे धोरण तयार केले जात असून, त्यावर नागरिकांकडून मते मागविली असल्याचे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी सांगितले.

यावेळी एनआयओचे संचालक प्रा.सिंह, एनसीएलचे संचालक डॉ. लेले, नीरीचे संचालक आणि डॉ. वेंकट मोहन यांनी मनोगत व्यक्त केले.

## संपादकीय....

### धो-धो पाऊस

कर्नाटक किनारपट्टीच्या बाजूला अरबी समुद्रात सध्या कमी दाबाचे क्षेत्र तयार होत आहे. त्यामुळे हवेतील बाष्पाचे प्रमाण वाढले आहे. हे बाष्प जमिनीच्या दिशेने येते आहे. या घडामोडींच्या प्रभावामुळे मध्य महाराष्ट्रासह कोकणात सर्वदूर गडगडाट आणि वादळीवाऱ्यांसह सध्या पाऊस पडत आहे. पुण्यातही मंगळवारी या कारणांमुळे पावसाने जोरदार हजेरी लावली.वातावरणा-तील घडामोडींमुळे शहरात मंगळवारी झालेल्या पावस-ाने दहा वर्षांपूर्वीचा विक्रम मोडला. पुण्यात १ मे ते २१ मे दरम्यान ११० मिलिमीटर पावसाची नोंद झाली. यापूर्वी मे २०१५ मध्ये १०६ मिमी पाऊस नोंदवला गेला होता. पुण्यात या महिन्यात सरासरी ३१.४ मिमी पाऊस पडतो. आठवडाभर पडलेल्या आणि मंगळव-ारी मुसळधार कोसळलेल्या पावसाने शंभरी ओलांडली. शिवाजीनगरमध्ये मे महिन्यात २४ तासांत ४०.५ मिमी पाऊस हादेखील एक उच्चांक ठरला. चिंचवडमध्ये एका रात्रीत १०१ मिमी पावसाची नोंद झाली असताना बुधवारी एनडीए परिसरात पावसाने शंभरी ओलांडली. पुढील काही दिवस पाऊस सक्रिय राहणार असल्याने महिनाभरातील आकडे अजून वाढणार आहेत. बुधव-ारी दुपारपर्यंत मात्र पावसाची उघडीप होती. दुपारनंतर ऊन आणि उकाडा वाढला होता. संध्याकाळपर्यंत सरी बरसल्या नाहीत; त्यामुळे आज पावसाने विश्रांती घेतल्याची नागरिकांमध्ये चर्चा सुरू असतानाच, रात्री आठनंतर पावसाला सुरुवात झाली. बावधन, बाणेर, कोथरूड, सिंहगड रस्ता, कात्रज, आंबेगाव, सहकारनगर भागांत सुरू झालेला पाऊस थोड्याच वेळात संपूर्ण शहरात बरसला. जिल्ह्यातही जोरदार सरी बरसल्या. पावसाला जोर असल्याने सलग दुसऱ्या दिवशी काही भागांत रस्त्यांवर पावसाचे पाणी साठले होते. काही भागांत हलक्या, तर काही ठिकाणी मध्यम स्वरूपाच्या पावसाची नोंद झाली. नरवीर तानाजी मालुसरे रस्त्यावर मुसळधार पाऊस सुरू होता. रात्री उशिरापर्यंत ढगांचा गडगडाट आणि विजांच्या कडकडाटासह पाऊस सुरू होता. अनुकूल वातावरणामुळे पुढील चार दिवस पा-वसाचा मुक्काम कायम राहणार आहे. आज, गुरुव-ारी दिवसभर आकाश ढगाळ राहणार असून, वादळी वारे आणि विजांच्या कडकडाटासह मध्यम ते जोरद-ार स्वरूपाच्या पावसाची शक्यता असल्याचा इशारा भारतीय हवामानशास्त्र विभागाने दिला आहे.

# चळवळीचे कार्य अशाच व्यक्ती करू शकतात ज्यांची समज, दृष्टी विकसित झालेली असते : बी. बी. मेश्राम

## फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलची ११० वी शतकोत्तर वैचारीक प्रबोधनात्मक कार्यशाळा संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजी नगर (प्रतिनिधी) : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल, गंगाधर गाडे प्रतिष्ठान व दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना) च्या संयुक्त विद्यमाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे नागसेन विद्यालय, पीरबाजार, उस्मानपुरा, छत्रपती संभाजी नगर येथे फुले शाहू आंबेडकराईट चळवळीची स्थिती समजून घेण्यासाठी बहुजन चळवळ : काल, आज आणि उद्या. या विषयावर ११० वी वैचारीक प्रबोधनात्मक विशेष कार्यशाळा १७ मे २०२५ ला संपन्न झाली.



फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम अध्यक्षीय मार्गदर्शन करताना म्हणाले की, आता केवळ मिनिमम कॉमन नव्हे तर मॅक्झिमम कॉमन प्रोग्रामवर एकत्रित येऊन कार्य केले पाहिजे. नामविस्त-ाराने नामांतर आंदोलनाची सांगता झाली, पुढे काय? याचा शोध घेताना के. जी. टू पी. जी. सह पीएचडी. पर्यंतच्या अभ्यासक्रमात बुद्ध, फुले शाहू आंबेडकरांच्या परिवर्तनवादी विचारांचा समावेश करण्यासाठी लढा दिला पाहिजे. राजाश्रय असताना चळवळ चालविणे सोपे असते तर राजाश्रय नसताना चळवळ चालविणे जिकिरीचे असले तरी महत्त्वपूर्ण असते. चळवळ चालविण्यासाठी मानवीय व आर्थिक संसाधनाचे इंधन आवश्यक आहे. करिता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या आदेशानुसार आपण आपल्या सर्व स्त्रोतातील ऊर्जेचा, उत्पन्नाचा २० वा हिस्सा प्रदान केला पाहिजे.

बहुतांश वेळा सर्व काही झाले पाहिजे म्हणून अनेक जण अपेक्षा व्यक्त करतात. शासनकर्ती जमात झाले पाहिजे असे अनेकांना वाटते पण आवश्यक कृती कार्यक्रम कसा राबवायचा? यावर मात्र कुणी बोलताना दिसत नाहीत? ज्याचे दुष्परिणाम समाजाला भोगावे लागत आहेत. रिकाम्या पोटी चळवळीचे कार्य करणे शक्य नसले तरी पोट भरलेली माणसं तरी कुठे कार्य करताना दिसतात? याचा अर्थ चळवळीचे कार्य अशाच व्यक्ती करू शकतात ज्यांची समज, दृष्टी (तळीळेप ेष णपवशी-ींरपवळपस) विकसित झालेली असते. म्हणून आपण प्रासंगिकतेचे भान ठेवून सामान्य कार्यकर्त्यांची दृष्टीकोनात्मक समज विकसित करण्यासाठी बहुजन चळवळ : काल, आज आणि उद्या या विषयावर उपाययोजनांच्या दृष्टीकोनातून चर्चा करीत आहोत.

उद्घाटनपर मार्गदर्शन करताना सामाजिक कार्यकर्ते सुभाष ठोकळ म्हणाले की, हा विषय आपल्या अस्तित्वाचा प्रश्न असल्यामुळे भूतकाळापासून प्रेरणा घेऊन पुढील वाटचाल केली पाहिजे. चळवळीला यश मिळण्यासाठी राजाश्रयाची आवश्यकता असते. ज्यात कायदे निर्माण करून अंमलबजावणी केली जाते. राजकीय सत्ता ही सर्व समस्यांची गुरुकिल्ली आहे. आपापसांतील संघर्ष टाळून शत्रूच्या विरोधात लढा दिला पाहिजे.

मुख वक्ते म्हणून बोलताना जिल्हा परिषदेचे माजी समाजकल्याण सभापती मारुती साळवे म्हणाले की, शत्रू अहोरात्र कार्यरत असल्याने आपण वेगाने गतिम ान झाले पाहिजे. वारकरी संप्रदायाचे आंदोलन बहुजनांसाठीच होते. ओबीसी समूह शत्रूचा वाहक असल्याने आपली वाताहात होत चालली आहे. २४ सप्टेंबर १८७३ ला राष्ट्रपिता ज्योतिबा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली होती. तसेच २४ सप्टेंबर १६७४ ला शिवाजी महाराजांचा द्वितीय राज्यभिषेक शाक्त पद्धतीने संपन्न झाला होता. येणाऱ्या काळात या दोन्ही घटनांचा विचार महोत्सव साजरा केला पाहिजे. आपण राजकारणाच्या अनुषंगाने फार अनभिज्ञ आहोत. समस्या निर्मूलनावर चर्चा करण्यासाठी किमान महिन्यातून एकदा तरी एकत्र आले पाहिजे.

विशेष मार्गदर्शक गंगाधर गाडे प्रतिष्ठान चे अध्यक्ष विलास कटारे म्हणाले की, या शहराला आकार आणि उकार देण्याचे कार्य चळवळीच्या माध्यमातून गंगाधर गाडे साहेबांनी केले आहेत. ७ जुलै १९७७ ला गाडे साहेबांनी नामांतरासाठी विद्यापीठाला पत्र दिले होते. त्याग आणि समर्पणाचे दुसरे नांव म्हणजे गंगाधर गाडे होय.

याप्रसंगी प्रवीण गाडेकर म्हणाले की, कार्यकर्ता सक्षम झाला तर तो चार दोन जणांना उभ करू शकेल. सिद्धार्थ पवार म्हणाले की, वर्तमानात चळवळीची वाताहात होत चालली असून उद्याची चळवळ कशी असेल ही गंभीर बाब आहे. सर्जेराव मनो-हरे म्हणाले की, रिकाम्या पोटी क्रांती होत नसते. चळवळीला मरगळ आली आहे. गंगाधर गाडे साहेबांनी आम्ह-ाला चळवळीचे बाळकडू पाजले आहे. संतोष खरात म्हणाले की, फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या संपर्कात आल्यामुळे बोलता येऊ लागले आहे. आपल्या बुद्ध विहारात फक्त वंदना होते म्हणून अशा कार्यशाळांचे आयोजन करून चळवळीचे पुनरुज्जीवन केले पाहिजे. एड. डी. बी. मेश्राम म्हणा-ले की, किमान समान कार्यक्रमांतर्गत एकत्रित येऊन कायदेशीर सहकार्याने परिणामकारक चळवळ चालविली पाहिजे. शैलेंद्र मिसाळ म्हणाले की, चळवळ सोडायचे कुणाच्या मनात आले तरी चळवळ मात्र त्यांना सोडत नसते. साडी, माडी व गाडीत व्यस्त असण-ारे शेणातले किडे आहेत. चळवळीला धार येण्यासाठी त्याग करावा लागेल. लेखक संतोष लेंभे म्हणाले की, आपण शिक्षणात पुढे असलो तरी व्यवस्थेत कुठे आहोत?

प्रास्ताविक एड. विलास रामटेके तर सुत्रसंचालन महादेव डांबरे यांनी केले. सुरुवातीला आदर्शांना मान्यवरांच्या हस्ते पुष्पमाला अर्पण करण्यात आल्या तर गाडे प्रतिष्ठान व स्टडी सर्कलच्या वतीने उपस्थितांचे स्वागत करण्यात आले. या कार्यशाळेला एड. विलास रामटेके, दीपक पगारे, बी. बी. मेश्राम, सुभाष ठोकळ, प्राचार्य विलास कटारे, प्रवीण गाडेकर, सिद्धार्थ पवार, सर्जेराव मनोरे, राकेश साबळे, अजय दाभाडे, संतोष खरात, मारुती साळवे, लता थोरात, शीला मोरे, शैलेंद्र मिसाळ, डी. बी. मेश्राम, संजय बनसोडे, एड. यु. एस. डोंगरे, पत्रकार राजू पडवळ, पत्रकार भानुदास मते, पत्रकार गौतम घाटसरे, लेखक संतोष लेंभे इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते. अशाप्रकारे आभार प्रदर्शनाने कार्यशाळा हर्षोल्ह-ासात संपन्न झाली.

# नव्या सर्वसमावेशक धोरणामुळे गृहनिर्माणात क्रांती येणार : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील सर्वसाम ान्य, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना परवडणारी घरे मिळण्याचा मार्ग राज्याच्या नव्या गृहनिर्माण धोरणामुळे प्रशस्त झाला आहे. हे एक क्रांतिकारी धोरण असून यामुळे राज्याच्या नगरविकास आणि गृहनिर्माणाला एक नवे रूप मिळेल. शिवाय या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक येऊन महाराष्ट्राच्या १ ट्रीलियन डॉलर्स अर्थव्यवस्थेच्या उद्दिष्टास मोठे बळ मि ळेल अशा शब्दांत उपमुख्यमंत्री तथा गृहनिर्माण मंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

राज्य मंत्रिमंडळाच्या आजच्या बैठकीत माझे घर-माझे अधिकार हे ब्रीदवाक्य असलेल्या राज्य गृहनिम ाण धोरण २०२५ ला मंजुरी देण्यात आली. हे धोरण आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसह सर्व घटकांना परवडणारी, शाश्वत आणि समावेशक घरे मिळवून देण्यासाठी निर्णायक ठरेल असे सांगून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, राज्य शासनाने २०३० पर्यंत आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि अल्प उत्पन्न गटांसाठी ३५ लाख घरे उभारण्याचे उद्दिष्ट ठेवले असून, सर्वसामान्यांच्या गरजा लक्षात घेऊन प्रत्येक घटकासाठी विशेष उपाययोजना केल्या आहेत.

**गृहनिर्माण माहिती पोर्टल**

या धोरणाची महत्त्वाची वैशिष्ट्ये सांगतांना उपमुख्यमंत्री श्री.

> **सर्वसामान्य, दुर्बलांचे घराचे स्वप्न सहज साकारणार; राज्याच्या अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळणार**

शिंदे म्हणाले की, यामध्ये ज्येष्ठ नागरिक, नोकरदार महिला, विद्या-र्थी, औद्योगिक कामगार, पत्रकार, दिव्यांग, माजी सैनिक या सर्वांच्या घरांचा विचार करण्यात आला आहे. यामध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा उपयोग करून राज्य गृहनिर्माण माहिती पोर्टल केंद्रीकृत डिजिटल प्लॅटफॉर्म म्हणून तयार करण्यात येईल. घरांची मागणी आणि पुरवठा संदर्भात डेटा, सदानिकांचे जिओ टॅगिंग, निधी वितरण, जिल्हानिहाय भूमी अधिकोष आणि महारेरा, महाभुलेख आणि पीएम गती शक्तिसारख्या प्रणालींशी याद्वारे समन्वय साधला जाईल.

**शासकीय जमिनीची बँक**

निवासी वापरासाठी योग्य असलेल्या शासकीय जमिनींची एक बँक निर्माण करण्यात येईल. महसूल व वन विभाग, एम एसआरडीसी, एमआयडीसी, जलसंपदा विभाग इत्यादींच्या समन्वयाने २०२६ पर्यंत ही राज्यव्यापी लँड बँक विकसित केली जाईल, असेही उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले.

**वॉक टू वर्क**

पंतप्रधानांनी नेहमीच कामाच्या ठिकाणाजवळ घरे असावीत अशी संकल्पना मांडली आहे. वॉक टू वर्क या संकल्पनेच्या अनुषंगाने या धोरणात रोजगार केंद्रांच्या जवळ, विशेषतः औद्योगिक क्षेत्रांतील



घरांच्या विकासावर भर देण्यात आला आहे. एमआयडीसी क्षेत्रातील सुविधा भूखंडाकरिता आरक्षित असणाऱ्या २० टक्के जागेपैकी १० ते ३० टक्के जागा केवळ निवासी वापरासाठी राखीव ठेवण्याचे देखील ठरविण्यात आले आहे. वाढते शहरीकरण पाहून केवळ १० लाखांपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या मोठ्या महानगरपालिकाच नव्हे तर सर्व महानगर प्रदेश विकास प्राधिकरणांना सर्वसमावेशक घरांचे आदेश देण्यात आले आहेत, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

**पुनर्विकास प्रकल्प वेळेत पूर्ण करणार**

स्वयंपुनर्विकास कक्ष नियोजन, निधी, विकासक निवड आणि प्रकल्प अंमलबजावणीच्या माध्यमातून सोसायट्यांना मार्गदर्शन करण्यासाठी समर्पित स्वयंपुनर्विकास कक्ष प्रस्तावित आहे. त्यासाठी सुरुवातीचा निधी २,००० कोटी रुपये ठेवणार असल्याची माहितीही उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी दिली.

मुंबई महानगराच्या जी हबवरील नीति आयोगाच्या शिफारशींनुसार, परवडणाऱ्या आणि सर्वसमावेशक गृहनिर्माण क्षेत्रात गुंतवणूक सुरू करण्यासाठी राज्य शासना-ने परवडणाऱ्या गृहनिर्माण निधीच्या माध्यमातून अंदाजे २०,००० कोटी रुपयांच्या व्यवहार्यता तफावत निधीचा महत्त्वपूर्ण भाग उपलब्ध करून देणे आवश्यक आहे असेही त्यांनी सांगितले.

हे धोरण ग्रीन बिल्डिंग पद्धतींना प्रोत्साहन देणारे आहे. पर्यावरणपूरक पायाभूत सुविधांच्या एकत्रिकरणास प्रोत्साहित करून शहरांचे अधिक हरितीकरण करण्यावर भर दिला आहे असे सांगून उपमुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, शाश्वत, आपत्ती-रोधक, किफायतशीर आणि हवामान योग्य बांधकाम पद्धतीसाठी ग्लोबल हाऊसिंग टेक्नॉलॉजी चॅलेंजअंतर्गत नाविन्यपूर्ण बांधकाम तंत्रज्ञानासह उष्णता, पूर आणि भूकंपासह हवाम ानाच्या जोखमींचा सामना करण्यासाठी नवीन बांधकामांची योजना आखली जाईल. सर्व पुनर्विकास प्रकल्पांम ध्ये सोसायटी, विकासक आणि प्राधिकरण यांच्यात त्रिपक्षीय करार असणे आवश्यक आहे, रहिवाशांच्या संरक्षणासाठी आगाऊ भाडे आणि बँक गॅरंटीसाठी एस्क्रो खाते असणे आवश्यक केले आहे. किफायतशीर आणि सामाजिक गृहनिर्माण प्रकल्पांना पाठिंबा देण्यासाठी सीएसआरमार्फत निधी गोळा केला जाईल. आयआयटी, आयआयएम युडीआरआय, डब्ल्यूआरआई यांची नॉलेज पार्टनर म्हणून नियुक्ती करण्यात येईल अशी माहितीही त्यांनी दिली.

**झोपडपट्टी पुनर्वसनाला प्राधान्य**

या धोरणात झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पांसाठी केंद्र शासनाच्या जमि नीचा वापर प्रस्तावित आहे असे सांगून उपमुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणा-ले की, केंद्र शासन व झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण झोपडपट्ट्यांच्या पुनर्वसनासाठीच्या संयुक्तपणे योजना राबविता येऊ शकतात. तसेच संबंधित केंद्र शासन विभागाकडून निधी घेण्यात येईल. एसआरए प्रकल्पांमध्ये पारदर्शकता, रिअल-टाइम मॉनिटरिंग आणि उत्तरदायित्व वाढविण्यासाठी हे धोरण माहिती तंत्रज्ञानावर आधारित करण्यात येईल. यामुळे लाभार्थींची निश्चिती, प्रकल्पाची स्थिती , निधी व्यवस्थापन यासारख्या बाबी शक्य होतील, असेही त्यांनी सांगितले.

झोपडपट्ट्यांचे पुनरुज्जीवन करण्यासाठी धोरणात्मक दृष्टिकोन म्हणून क्लस्टर पुनर्विकासाला या धोरणात प्रोत्साहन देण्यात आले आहे. प्रगती न झालेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनांमध्ये नवीन सक्षम विकासकांची निवड निविदा प्रक्रियेतून केली जाईल. विलंब टाळून गैरप्रकार पूर्णपणे बंद केले जातील याचा पुनरुच्चार उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केला.

## 'एफएसएसएआय'ने राज्यांना फळांवर कृत्रिम रंगांचा वापर रोखण्यासाठी तपासणी आणि विशेष मोहीम राबवण्याचे केले आवाहन

# 'एफएसएसएआय'ने फळांच्या कृत्रिम पिकवण्यासाठी कॅल्शियम कार्बाइडच्या वापरावर आणली बंदी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाने (एफएसएसएआय) सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना अवैधपणे फळांवर कृत्रिम रंगांचा वापर रोखण्यासाठी तप-ासणी आणि विशेष मोहीम राबवण्याचे आवाहन केले आहे. यासह फळांच्या कृत्रिम पिकवण्यासाठी कॅल्शियम कार्बाइडच्या वापरावर बंदी आणून ग्राहकांच्या आरोग्याचे होणारे नुकसान थांबवून सकारात्मक पाऊल उचलले आहे.

सर्व राज्य, केंद्रशासित प्रदेशांच्या अन्न सुरक्षा आयुक्त आणि 'एफएसएसएआय'च्या प्रादेशिक संचालकांना फळांच्या बाजारपेठा आणि मंडईंवर कडक लक्ष ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहे, जेणेकरून कॅल्शियम कार्बाइड सारख्या (ज्याला सामान्यतः 'मसाला' म्हण-तात) पिकवणाऱ्या एजंट्सचा अवैध




वापर रोखता येईल.

या मोहिमेचा भाग म्हणून, ज्या ठिकाणी फळांची साठवणूक केली जाते तिथे जर कॅल्शियम कार्बाइडचा वापर आढळला तर त्याला परिस्थितीजन्य पुरावा मानून अन्न व्यवसाय ऑपरेटर (एफबीओ) वर खाद्य सुरक्षा आणि मानके (एफएसएस) कायदा, २००६ अंतर्गत कारवाई केली जाणार आहे.

फळांच्या कृत्रिम पिकवणीसाठी कॅल्शियम कार्बाइडचा वापर खाद्य सुरक्षा आणि मानके (विक्रीवरील प्रतिबंध आणि निर्बंध) नियम, २०११ अंतर्गत कडकपणे प्रतिबंधित आहे. या पदार्थाचा वापर गंभीर आरोग्य धोके निर्माण करतो आणि यामुळे तोंडाला जखम, पोटात जळजळ आणि कर्करोगजन्य गुणधर्म निर्माण होऊ शकतात.

याशिवाय, एफएसएसएआयने असेही निर्देश दिले आहेत की, ज्या एफबीओज् कृत्रिमरित्या केळी पिकवताना रसायनांचा वापर करतात, त्यांच्यावरही कारवाई केली जावी. यासंदर्भात, प्राधिकरणाने एक सर्वसम ावेशक मार्गदर्शन सूचना जारी केल्या आहेत, त्या ु.षीीरळ.सीं.ळप या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

यात फळांना कृत्रिमरित्या पिकवण्यासाठी इथिलीन गॅसचा वापर कसा करावा याबाबत मानक संचालन प्रक्रिया (एसओपी) स्पष्टपणे नमूद केली आहे. इथिलीन गॅस वापरण्याच्या सर्व पैलूंचा समावेश आहे, एफएसएसएआयने सर्व अन्न व्यवसाय ऑपरेटरांना या एसअ-ोपींचे पालन करण्याचे आणि सुरक्षित पिकवण पद्धतींचा अवलंब करण्याचे आवाहन केले आहे.

एफएसएसएआयच्या प्रसिद्धी पत्रकात एफएसएस कायदा, २००६ अंतर्गत कडक कारवाई होऊ शकते, त्यामुळे पुरवठा साखळीतील सर्व भागधारकांनी केवळ सुरक्षित आणि कायदेशीर फळे बाजारात आणा-वीत याची खातरजमा करावी. तसेच ग्राहकांनी सुरक्षित आणि दर्जेदार फळांचा आनंद घेण्यासाठी सतत सजग राहण्याचे, आवाहन करण्यात आले आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# ग्रँड ट्रॅक्टर शोरूमचा बाळा नांदगावकर यांच्या हस्ते दिमाखात उद्घाटन सोहळा संपन्न

## ग्रँड ट्रॅक्टरच्या माध्यमातून ब्रँड बनवून शेतकऱ्यांना सुजलाम-सुफलाम करा : बाळ नांदगावकर



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : शेतकरी बांधवांसाठी धोत्रेज उद्योग सम ूहाच्या वतीने येथील भटुंबरे चौक टेंभुर्णी पंढरपूर मार्गावर उभारण्यात आलेल्या ग्रँड ट्रॅक्टर शोरूम चे उद्घाटन माझी गृहराज्यमंत्री तथा मनसेचे नेते बाळ नांदगावकर, धाराशिव बँकेचे चेअरमन ह. भ. प. वसंतराव नागदे यांच्या हस्ते मोठ्या दिमाखात संपन्न झाला यावेळी म नसेने ते अविनाश अभ्यंकर आमदार अभिजीत पाटील सहकार शिरोमणी चे साखर कारखान्याची चेअरमन कल्याण काळे माजी उपनगराध्यक्ष नागेश भोसले , काँग्रेसचे रॉकी बंगाळे या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे उपस्थित होते या उद्घाटन समारंभ

कार्यक्रमाप्रसंगी बोलताना बाळ नांदगावकर यांनी सुरुवातीला नूतन व्यवसायाबद्दल दिलीप धोत्रे यांना शुभेच्छा देताना निष्ठावान कार्यकर्ता कसा असावा जनतेसाठी कायम मनाची दारी खोली ठेवणारा नाती कशी जपावी ही बापू कडून शिकावी बापू तुम्ही ब्रँड आहात असे उद्गार काढत ग्रँड शेतकऱ्यांच्या मनामध्ये रुजला पाहिजे

शेतकरी कायम सुजलाम-सुफलाम असला पाहिजे. असे राज ठाकरे यांची स्वप्न सत्यात उतरवण्याची काम ट्रॅक्टर शोरूम च्या माध्यमातून पूर्ण होई शेतकऱ्यांच्या मुलांना कशी मदत होईल याचे काम करणे सुनातून विश्व निर्माण करण्याचे काम शेतकरी मुलांमध्ये आहे महाराष्ट्र नवनिर्माण सेना कायमस्वरूपी मदत करत आहे

यापसंगी राज्यपरातील मनसेचे नेते मंडळी सोलापूर जिल्ह्यातील विविध पक्ष व सामाजिक संघटनेचे पदाधिकारी पंढरपुरातील हाजी माजी नगरसेवक यांच्यासह पंढरपूर शहर व तालुक्यातील शेतकरी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

यापसंगी मनसे नेते अविनाश अभ्यंकर, आमदार अभिजीत पाटील, सहकार शिरोमणी चे चेअरमन कल्याण काळे, ज्यांनी आपली मनोगत व्यक्त केली व्यक्त करत यांनी दिलीप धोत्रे यांना नवीन व्यवसाय च्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी कार्यक्रमास उपस्थित असलेल्या मान्यवर मंडळीचे मनसेने ते दिलीप बापू धोत्रे यांनी आभार मानले

यावेळी दयावान ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष लखन चौगुले, जय भवानी सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष अरुण भाऊ कोळी, विरोधी पक्षनेते सुधीर धोत्रे, शिवप्रेमी चे संस्थापक अध्यक्ष नानासाहेब कदम, ज्येष्ठ नेते सुधीर भोसले, शिवसेना जिल्हा संघटक संजय बनपट्टे, संभाजी ब्रिगेडचे किरण घाडगे, अकलूज येथील समाजसेवक लक्ष्मण बनपट्टे माजी नगरसेवक महादेव धोत्रे, सुधाकर बंदपट्टे लखन चौगुले, आदित्य फत्तेपूरकर डी राज सर्व गोड, मी वडर महाराष्ट्र संघटनेचे जिल्हाध्यक्ष दत्ता भोसले बाबा बडवे महेश उपाड गणेश उबाळे रॉकी कुदुर माजी नगरसेवक धनंजय कोतकर मोहम्मद वस्ताद यासीन शेख शिवाजी मस्के राष्ट्रवादीचे श्रीकांत शिंदे सतीश शिंदे शेतकरी संघटनेचे पाटील प्रशांत शिंदे ऋषिकेश भालेराव अतुल मामाने बाबा चव्हाण संतोष कवडे रविकांत पाटील अमित अशोक इंगळे कैलास तासकर, इत्यादी जण मोठ्या संख्येने उपस्थित होते

# विद्या प्रतिष्ठानचे पॉलिटेक्निक, इंदापूर येथे डॉ. विजय कोल्हे यांची सदिच्छा भेट

## विविध शैक्षणिक उपक्रमांचे केले कौतुक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर/प्रतिनिधी :अतुल सोनकांबळे : दिनांक १७ मे २०२५ रोजी महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, पुणे येथील उपसंचालक डॉ. विजय कोल्हे यांनी विद्या प्रतिष्ठानचे पॉलिटेक्निक, इंदापूर या संस्थेला सदिच्छा भेट दिली. या भेटी दरम्यान त्यांनी महाविद्यालयातील परीक्षा विभाग, वितरण विभाग, उत्तरपत्रिका तपासणी विभाग आणि चडइढए अधिकृत स्कॅनिंग सेंटर यांना भेट देऊन तेथे सुरू असलेल्या विविध कामकाजाची पाहणी केली.

डॉ. कोल्हे यांनी महाविद्यालयाम ध्ये तंत्रशिक्षण मंडळाच्या माध्यमातून उभारण्यात आलेली केंद्रे एकाच ठिकाणी अत्यंत कार्यक्षमतेने आणि नियमानुसार कार्यरत असल्याबद्दल समाधान व्यक्त केले. त्यांनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुजय देशपांडे तसेच सर्व विभाग प्रमुखांचे कौतुक केले.

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या उल्लेखनीय प्लेसमेंटबाबत त्यांनी विशेष गौरवोद्गार काढले. १०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी विप्रो, कमिन्स इंडिया लिमिटेड, एल अँड टी, भारत फोर्ज, बजाज ऑटो, लक्ष्मी कन्स्ट्रक्शन आदी नामांकित कंपन्यांमध्ये कॅम्पस प्लेसमेंटद्वारे यश मिळवले आहे. ग्रामीण भागात असून देखील अशा नामवंत कंपन्यांमध्ये विद्यार्थ्यांना संधी मिळणे ही बाब कौतुकास्पद असून, यामागे महाविद्यालयाच्या आधुनिक तांत्रिक सुविधा आणि उच्च दर्जाचे शिक्षण कारणीभूत आहे, असे डॉ. कोल्हे यांनी नमूद केले.







त्यांनी चघउड अंतर्गत कार्यरत असलेल्या ळडळज्ञश केंद्रासह आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्रामार्फत राबवण्यात येणाऱ्या कौशल्य प्रशिक्षण अभ्यासक्रमांची माहिती घेतली आणि विद्यार्थ्यांना उद्योगजगतातील गरजांनुसार सक्षम बनवणाऱ्या या उपक्रमांना प्रोत्स-ाहन दिले.

महाविद्यालयास प्राप्त झालेले खडज २१००१:२०१८ हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रमाणपत्र हे विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच म हाविद्यालय लवकरच छइ अक्रीडिटेशन प्राप्त करण्याच्या तयारीत असून, त्याबाबत त्यांनी शुभेच्छा दिल्या.

यावेळी डॉ. कोल्हे यांनी दिनांक ३१ मे २०२५ रोजी महाविद्यालयात होणाऱ्या १० वी आणि १२ वी च्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करिअर मार्गदर्शन कार्यक्रमात सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी आणि पालकांनी उपस्थित राहून मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

या भेटीदरम्यान महाविद्यालयाचे विविध विभागप्रमुख, शिक्षकवृंद आदी उपस्थित होते. डॉ. कोल्हे यांची ही भेट महाविद्यालयासाठी प्रेरणादायी ठरली.




# सिध्दाराम म्हैत्रे यांचा शिवसेनत प्रवेशामुळे पक्षाची ताकत वाढणार : रवीना राठोड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : माजी गृहराज्यमंत्री व अक्कलकोट तालुक्याचे पाच वेळा आमदार असलेले सिध्दाराम म्हेत्रे आज काँग्रेसला सोडण्याचा निर्णय घेतला व शिवसेना शिंदे गटात प्रवेश करणार असे म्हणा-ले. शिवसेना महिला आघाडी जिल्हाप्रमुख यांनी सिद्धाराम म्हैत्रे शिवसेनेत प्रवेश केल्याने आमच्या पक्षाची ताकद वाढणार आहे. त्यांचे आम्ही पक्षात स्वागत करू. अक्कलकोट तालुक्याच्या विकासासाठी सिद्धाराम म्हैत्रे यांची शिवसेना पक्षाला गरज आहे. माननीय उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांच्या नेतृत्वाखाली ते अक्कलकोटचा विकास करतील व जुन्या शिवसेनीकाना ते बळ देतील सर्व शिवसैनिकाना साथ घेऊन काम करतील आम्ही सर्व शिवसैनिक त्यांच्या पाठीशी आहोत असे शिवसेना महिला आघाडी जिल्हा प्रमुख रवीना राठोड म्हणाले




# अक्कलकोट तालुक्यातील बौद्ध धम्म परिषद उत्साहात मंगलमय वातावरण संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनीधी भारतीय बौद्ध महासभा अक्कलकोट वतीनेअक्कलकोट तालुक्यातील बौद्ध धम्म परिषद प्रचंड उत्साहात मंगलमय वातावरण पार पडली.

भगवान बुद्ध, विश्वरत्न बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना वंदन करून, पंचशील ध्वज-ारोहण करून समता सैनिक दल यशसिद्धी आजी-माजी सैनिक यांच्याकडून श्रामणेर संघास मानवंदना हसा-पूर येथे देण्यात आली.

विश्वाला युद्ध नाही तर बुद्ध गरजेचा आहे ! जग मे बुद्ध का नाम है यही भारत की शान है ! जस्टिस फॉर बुद्धगया ! च्या जयाघोषात अक्कलकोट शहरांमध्ये शेकडोच्या संख्येने बौद्ध उपासक उपासिका बांधव रॅलीमध्ये सहभागी होते.

अक्कलकोट तालुक्यातील पहिल्या बौद्ध धम्म परिषदेचे अध्यक्ष बौद्धाचार्य साहिल संजय कांबळे हे होते.

अँड.डॉ.जयसेन गवई राष्ट्रीय उपाध्यक्ष, सुनंदाताई वाघमारे महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष,शारदाताई गजभिये महाराष्ट्र राज्य विभागीय संघटक, आधी सहप्रमुख वाक्यांचे प्रमुख विषयावर मार्गदर्शन संपन्न झाले.

याप्रसंगी जिल्हाध्यक्ष अण्णासाहेब वाघमारे, धम्मपाल माने, धम्मरक्षिता कांबळे, मरेप्पा शिवशरण,पूजा घटकांबळे, कमल थोरे, वैशाली खंडाळे सचिन मोरे, ज्योतिबा पारखे, आधी सह जिल्हा व तालुका पदाधिकारी तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती हसापूर व बौद्ध समाज बांधव शेकडोंच्या सहकार्याने मोठ्या उत्साहात कार्यक्रम पडला पार पडला

अन्नदान धम्मदान श्रमदान करणाऱ्या मान्यवरांचे याप्रसंगी मोठ्या आदरपूर्वक सन्मान करण्यात आले.



## सत्य अन्वेषण व भाषिक विश्लेषणाणे प्रतिकांची चिकित्सा करावी

## गोपाळ गुरु यांचे प्रतिपादन

# विद्रोही सांस्कृतिक चळवळ चिंतन शिबिर वाई येथे संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वाई : संस्कृतीचा विचार एकाच पठडीने करणे हे एकांगी विचार करणे आहे संस्कृतीच्या विश्ले-षणात विवेक आणि सत्य अन्वेषण याचा तारतम्याने विचार करण्याची गरज आहे तरच भावनेत अडकलेली संस्कृती कारण मीमासेकडे भार-तात नेता येईल संस्कृतीला ज्ञान शक्तीने उभी लागेल हे काम विद्र-ोही संस्कृतिक चळवळीने करीत असताना ब्राह्मणी आणि अब्रह्मणी या वादात खूप काही न अडकता श्रम श्रमिक आणि मातृसत्ताक व्यवस्था या दिशेने विद्रोही संस्कृती चळवळ पुढे जायला हवी ब्राह्मणी शब्दांच्या प्रतिक्रियांना उत्तर देण्यात विद्र-ोही चळवळ आपला पाया सशक्त करत नाही कारण विद्रोहींना विच-ाराची उसंत नाही म्हणून हा विचार मुख्य प्रवाहात आणणे खूप महत्त्वाचे आहे असे विचार गोपाळ गुरु यांनी काढले

विद्रोही सांस्कृतिक चळवळ यांच्यावतीने आयोजित केलेल्या दोन दिवशीवाई येथील बोपोर्डी येथील या चिंतन शिबिराच्या उद्घाटनपरच्या भाषणात गोपाळ गुरु बोलत होते. विचार मंचावर अमिता देशमुख या विशेष उपस्थित होत्या.

स्त्रिया या श्रम करतात कृती करतात त्यांच्या कार्यातून निर्माण झालेल्या होत असलेल्या संपत्तीला सांस्कृतिकतेची जोड देऊन श्रम हटवणे दुर्लक्षित करणे हा सांस्कृतिक वाद्यांचा नित्य उद्योग असतो असे सांगून गोपाळ गुरु म्हणाले की प्रतीका चिकित्सेत काम करत असताना सम ाजाला इथिक्स आणि इमोशन यातील फरक सांगितला पाहिजे भावनेच्या अधीन गेलेली संस्कृती तिच्या पोटातील इथिक्सचे विश्लेषण करत नाही त्यामुळे सांस्कृतिक तर ही कठोर शब्दांच्या मध्ये अडकले आहे ज्या देशात नैतिकता श्रम आणि उत्पादन यांच्या बद्दल चांगले विचार चांगल्या भावना नाहीत अशा या देशात मुठभर यांचे विशेषांचे तेवढे चांगले आणि इतरांचे स्वच्छ हा विचार इथे रुजला आहे विद्रोह हे विचार बदलाचे काम करू पाहतो आहे विद्रोही सांस्कृतिक चळवळीने हे सगळे विचारधन अब्राह्मणी लोकांपर्यंत पोहोचवले पाहिजेत. असे सांगून गोपाळ ग्रुप पुढे म्हणाले की संस्कृतीच्या पोटात नव्या नव्या कल्पना सतत भर टाकल्या जातात या कल्पनाच संस्कृतीचे नाव धारण करून सार्वजनिक जीवन पुढे येत असतात आणि म्हणून या संस्कृतीच्या कल्पनांच्या मधील राजकारण कोणते आहे हे उघड करावे लागेल शुद्राती शूद्रांना सत्यशोधकांना हे सर्व सतत न कळल्यामुळेच भेदाभेद हे संस्कृतीच्या नावात खाली वाढत चालले आ-हेत कारण हा वर्ग बोलत नाही .हे अब्रह्मणी राजकारण हे आशयांचे शब्दांचे जे चालू आहे त्याचे चिंतन विद्रोही सांस्कृतिक चळवळ करते आहे ही एक मोठी समाधानाची बाब आहे असे सांगून गोपाळ गुरु पुढे म्हणाले की जे जे आमचे होते ते आमचे नाही हे सांगण्याची चळवळ धैर्य निर्माण करावे लागणार आहे.

जे जे आमचे आहे ते शोधून नवा फॉर्म देऊन आम्हाला पुढे आणावे लागणार आहे आमचे होते पण ते एका वर्गाचे झाले असे सांगून गोप-ाळ गुरुपुढे म्हणाले की अधिकृतता अस्सल ता ही संस्कृतीतील शोधा-वी लागणारी निरंतर ची गोष्ट आहे त्यासाठी आमचा सतत संस्कृतीची म ोडतोड करण्याचा अट्टाहास असण्या बरोबर आम्हाला आमचे डी कन्स्टॉक केलेले पुन्हा मांडावे लागणार आहे. गोपाळ गुरू पुढे म्हणाले की

शरद पाटील यांना हे सर्व करण्यासाठी संस्कृतचा आधार घ्यावा लागला विद्रोही संस्कृतिक चळवळीला हे संस्कृतीक अन्वेषण करण्यासाठी संस्कृत प्राकृत पाली या भाषांच्या अंतरंगात जावे लागेल

मुळात संस्कृतीच्या आ-वरणात आज दडलेली वेदना बाहेर काढण्यासाठी नाच लावणी पोवाडा भारुड यातील कलेची व दुःखाची कारणे नीट मांडावी लागतील स्वतः ला उद्ध्वस्त करून संस्कृतीचा व्यवहार सांगड घालत पुढे जावे ला-गेल तेव्हाच अस्सल प्रतिमा आणि त्यातील विचार व्यवहार राजकारण आपणाला मांडता येईल संस्कृतीच्या राजकारणाचा सतत विपर्यास केला गेला आहे त्यामुळे जाणीवेत आणि नेनिवेत तसेचदृष्टीत आणि सौंदर्यात संवेदनेत संस्कृतीने खूप प्रदूषण केले आहे हे सगळे नीटपणे मांडावे ला-गेल जाणीवांची पुनर तपासणी करावी लागेल ने निवांचे दुर्लक्ष न करता संस्कृतीच्या असंख्य विभागात काम करावे लागेल असेही गोपाळ गुरु यांनी सांगितले

संस्कृतीच्या व्यवहारात वापरले जाणारे शब्द हे रिजेक्ट करण्याची नाकारण्याची तयारी ठेवली पाहिजे पर्यायी शब्द मौखिक परंपरेतून शोधून काढावे लागतील तरच अभिजनवाद्यांच्या संस्कृतीच्या सम र्थनाच्या शब्दांना आपणाला पराभूत करता येईल रसस्वाद अभिरुची याचे उदाहरण देऊन ते म्हणाले की मी जेव्हा विद्रोहात असतो तेव्हा मी दुः खी असतो त्या दुःखातील सौंदर्य हे परिपक्वतेकडे नेता येत नाही म्हणून भूतकाळात जाऊन हे सगळे नेनिवेच्या पातळीवर तपासण्यातच विद्रोही सांस्कृतिक चळवळ सशक्त होऊ शकते

या उद्घाटन सत्रात विशेष उपस्थित असलेल्या अशा विशेष बहुमोल सहकार्य करणाऱ्या अमिता देशमुख यांनी सौंदर्य संवेदना आणि वर्तमान यातील भाषिक व दृश्य गोंधळ जो चालू आहे तो आपल्या धारणा बदल होतो म्हणून विद्रोही सांस्कृतिक चळवळीने सौंदर्य संवेदना यांची परिमाणे नव्याने शोधून त्यांना आधी मान्यता देण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज असल्याचेही देशमुख यांनी सांगितले.

विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्या चिंतन शिबिराचे उद्घाटन सत्र पार पडताना दोन दिवसाच्या चर्चासत्रांची व सांस्कृतिक चळवळीच्या नव्या भूमिकांची गरज व चिंतनाचे अत्यावश्यक याबाबत प्राध्यापक प्रतिमा परदेशी यांनी व कॉम किशोर ढमाले यांनी पहिल्या सत्रात प्रस्ताविक पाहुण्यांची ओळख शिबिराचा हेतू कथन केला या शिबिरास महाराष्ट्रातून जवळपास ६० कार्यकर्ते विविध जिल्ह्यातून उप-स्थित होते.

# रिपब्लिकन पक्षातर्फे देशभर भारत जिंदाबाद यात्राचे आयोजन

## केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांची घोषणा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई दि.२१ जम्मू काश्मीर मधील पहलगाम येथे निरपराध भारतीय पर्यटकांवर दहशतवाद्यांनी भ्याड हल्ला करून २८ जणांची क्रूर हत्या केली.या दहशतवादी हल्ल्याचा बदला घेण्यासाठी भारताने सिन्दुर ऑपरेशन करून पाकव्याप्त काश्मीर मधील दहशतवाद्यांची ठिकाणे उध्वस्त करून १०० पेक्षा जास्त दहशतवादी ठार केले.प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी जाहीर केल्या प्रमाणे नेमके हेरून दहशतवादी ठिकाणे उध्वस्त केली. दहशतवाद्यांना धडा शिकवला.भारतीय सैन्याने अतुलनीय शौर्य दाखवून देशाचे संरक्षण करून शत्रू राष्ट्र पाकिस्तान ला चांगलाच धडा शिकवला.भारताचे दहशतवादाविरुद्ध युद्ध कायम राहील . भारतीय सैन्याचा



आम्हाला अभिमान आहे.प्रधानमंत्री नरेंद्र मोदींनी पाकिस्तानला आणि दहशतवाद्यांना चांगला धडा शिकवला याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदींचे अभिनंदन करणारी ; दहशतवादाला पोसणाऱ्या पाकिस्तानला धडा शिकविण्यासाठी भारतीय सैन्याने हाती घेतलेल्या सिन्दुर ऑपरेशनच्या यशाबद्दल रिपब्लिकन पक्षातर्फे देशभर

भारत जिंदाबाद यात्रा काढण्यात येणार असल्याची घोषणा आज रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांनी मुंबईत प्रेस क्लब येथे आयोजित पत्रकार परिषदेत केली.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सिन्दुर ऑपरेशन यशस्वी करून आपले खंबीर नेतृत्व सिद्ध केले. भारतीय सैन्याचा आम्हाला अभिमान आहे.भारताचे वायुदल नौदल आणि भूदल यांनी उत्कृष्ट कामगिरी अतुलनीय शौर्य दाखविल्याचे. आपल्या भारतीय सैन्याचा आम्हाला अभिमान असल्याचे प्रतीक म्हणून भारत जिंदाबाद यात्रा रिपब्लिकन पक्ष देशभर काढणार आहे.येत्या दि.२२ मे ते ६ जून पर्यंत देशभरात सर्व राज्यांत महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यात आणि तालुक्यात रिपब्लिकन पक्ष भारत जिंदाबाद यात्रा हाती तिरंगा ध्वज घेऊन काढण्यात येणार आहे अशी माहिती ना. रामदास आठवले यांनी आज पत्रकार परिषदेत दिली. सर्व रिपब्लिकन कार्यकर्त्यांनी ही भारत जिंदाबाद यात्रा आप आपल्या भागात यशस्वी करावी.रिपब्लिकन पक्षाने आयोजित केलेल्या या भारत जिंदाबाद यात्रेत सर्व नागरिकांनी सहभागी व्हावे असे आवाहन ना.रामदास आठवले यांनी केले आहे.

## थोडक्यात...




### धंदा करायचा असेल तर पैसे द्यावे लागणार असे म्हणत तरुणास मारहाण ; एकावर गुन्हा

सोलापूर (प्रतिनिधी) धंदा करायचा असेल तर महिन्याला तीन हजार रुपये द्यावे लागतील असे म्हणत तरुणास मारहाण करून ४० हजारांचे नुकसान केल्याप्रकरणी एका जनाविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.हि घटना १८ मे रोजी दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास अवंती नगर येथे घडली.याप्रकरणी योगेंद्रसिंग शिताराम यादव (वय-२५,रा.चुर्खी रोड,बंधीरा बायपास, इरई जालीन,उत्तर प्रदेश) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून भीम उर्फ आकाश गुरव (रा.अभिमानाश्री नगर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला.

याबाबत अधिक माहिती अशी की,फिर्यादी व फिर्यादी यांचा भाऊ विशाल असे पाणीपुरी व चायनीज खाद्यपदार्थ विक्री करत होते.त्यावेळी सायंकाळी सातच्या सुमारास फिर्यादीच्या भेळ गाड्याजवळ वरील संशयित आरोपी हा तिथे येऊन धंदा करायचा असेल तर महिन्याला तीन हजार रुपये द्यावे लागतील. नाहीतर तुम्हाला येथे धंदा करू देणार नाही असे म्हणाला.त्यावेळी फिर्यादी त्यास पैसे देण्यास नकार दिल्यानंतर त्याने मैं इधर का दादा हू तुमको इधर धंदा करना है तो पैसा देना ही होगा असे म्हणून फिर्यादीची गच्ची पकडून थोबाडीत मारून फिर्यादी याचा भेळचा गाडा व चुलात भाऊ याचा चायनीज चा गाडा हाताने ढकलून दहशत निर्माण करून चाळीस हजार रुपयांचे नुकसान केले आहे.असे फिर्यादीत नमूद आहे.पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक पाटील हे करीत आहेत.

# बोपगांव ग्रामपंचायतच्या सरपंचपदी सारिका गुरव बिनविरोध

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर/प्रतिनिधी/डॉ विनायक गायकवाड : बोपगाव तालुका पुरंदर येथील ग्रामपंचायत च्या सरपंच पदी सारिका कृष्ण गुरव यांची बिनविरोध निवड २०२१ ची निवडणूक बिनविरोध करून बोपगाव गावाने पुणे ज़िल्ह्या मध्ये एक इतिहास घडविला नऊ महिला सदस्य बिनविरोध देऊन नऊच्या नऊ महिलांना पाच वर्षांमध्ये सरपंच पदाचा बहुमान देण्याचे काम गावाने केले सौ ज्योती कुंडली फडतरे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्यानंतर रिक्त झालेल्या जागेवर सौ सारिका कृष्ण गुरव यांची बिनविरोध निवड करण्यात आली, निवडणूक




निर्णय अधिकारी म्हणून श्री सुहास कांबळे( मंडल अधिकारी सासवड )यांनी काम पाहिले तसेच (ग्रामपंचायत अधिकारी) सौ राखी ढगारे व ग्राम महसूल अधिकारी श्री कल्पेश कटारे यांनी सहाय्यक म्हणून काम पाहिले बोपगाव गावातील कला, क्रीडा, सांस्कृतिक,सामाजिक,राजकीय जडणघडणीत बोपगाव चे माजी सरपंच कै बाळासाहेब गुरव यांचा सिंहाचा वाटा होता त्यांच्या सुनबाई सौ सारिका गुरव या सरपंच पदी निवड झाल्यामुळे सर्व गावाने त्यांचे अभिनंदन केले व समाधान व्यक्त केले व त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या,गावातील महिला बचत गटातील महिला भगिनी ग्रामस्थ बंधू भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच माजी सरपंच सौ ज्योती कुंडलिक फडतरे व सर्व सहकारी सदस्या यावेळी उपस्थित होत्या. निवृत्ती (आप्पा )फडतरे, सर्जेराव (नाना )जगदाळे, कुंडलिक फ ड त रे , भा ऊ सा हे ब किसन फडतरे, विजय फडतरे, सोनबा फडतरे, तुकाराम शेठ फडतरे, साहेबराव मारुती फडतरे, शामराव फडतरे,मस्कु अप्पा फडतरे, काळू नाना पवार,कानिफनाथ फडतरे,तानाजी पंढरीनाथ फडतरे,संतोष जगदाळे, भिमाजी जगदाळे, अतुल किसन फडतरे, पांडुरंग फडतरे,विनायक गायकवाड, मधुकर किसन फडतरे, पुंडलिक गुरव, मधुकर किसन फडतरे, कृष्ण गुरव, शांताराम जगदाळे, महादेव भिमाजी फडतरे यासह गावातील ग्रामस्थ बंधू-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या चरणी सोन्याचा तुळशीहार अर्पण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीस ५.२५ लाख किंमतीचा व ६१.४८ ग्रॅम वजनाचा सोने पदकासह तुळशी हार, नागपूर येथील भाविक आशा नवघरे यांनी अर्पण केल्याची माहिती व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.

त्याबद्दल देणगीदार यांचा मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा व उपरणे देऊन सन्मान केला. यावेळी देणगीदार यांचे कुटुंब व विभाग प्रमुख राजेंद्र सुभेदार उपस्थित होते.



# सोलापूर जिल्ह्यात काँग्रेसला तगडा झटका

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : विधानसभा निवडणुकीनंतर राज्यात नाट्यमय घटना होताना दिसत आहेत. त्यातच महाविकास आघाडीला राजकीय धक्के बसत आहेत. आता सोलापूर जिल्ह्यात काँग्रेसला तगडा झटका बसला आहे.

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, अक्कलकोट माजी आमदार आणि माजी गृहराज्यमंत्री सिद्राम म्हेत्रे यांनी काँग्रेसला सोडचिट्टी दिली आहे. मैत्री हे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिंदे गटात प्रवेश करणार आहेत. ३१ मे रोजी मेहेत्रे हे कार्यकर्त्यासह शिंदे गटात प्रवेश करणार असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे आगामी काळात अक्कलकोट तालुक्यातील राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता आहे.

# सोलापुरात होणार एमपीएल, वुमेन्स महाराष्ट्र प्रीमियर लीग स्पर्धा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : महाराष्ट्र क्रिकेट संघटनेच्या वतीने आज सोलापुरात पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली. यावेळी महाराष्ट्र प्रीमियर लीग आणि वुमेन्स महाराष्ट्र प्रीमियर लीग स्पर्धांची माहिती देण्यात आली.

महाराष्ट्र क्रिकेट संघटनेची 'रीजनल क्रिकेट अकादमी' सोलापूर शहरात लवकरच सुरु होत आहे. तसेच सोलापूर क्रिकेट संघटनेला एमसीएच्या माध्यमातून क्रिकेटच्या पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी ७५ लाख रुपये देण्यात आल्याची माहिती यावेळी एमसीएचे अध्यक्ष आ. रोहित पवार यांनी सांगितले.

यावेळी थचझङमध्ये खेळत असलेल्या सोलापूर स्मॅशर्सच्या जर्सीचे अनावरणही करण्यात आले. तसेच संघ घेताना ज्या संघमालकांनी विश्वास दाखवला,




त्यांचेही आभार मानण्यात आले.

या प्रसंगी महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष आ. रोहित पवार, सचिव ॲड. कमलेश पिसाळ, अपेक्स कौन्सिल सदस्य सुनील मुथा, विनायक द्रविड, श्री. सुशील शेवाळे, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अजिंक्य जोशी, सोलापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष दिलीप माने, व्हाईस चेअरमन श्रीकांत मोरे, सचिव चंद्रकांत रेंबुर्सु, उपाध्यक्ष प्रकाश भुतडा, माजी अध्यक्ष दत्ता सुरवसे, सोलापूर स्मॅशर्स संघाचे प्रतिनिधी शुभम बागुल, सीईओ किरण आढाव, मेंटर रोहित जाधव, मॅनेजर मनीषा कोल्हटकर, तसेच कप्तान भारतीय महिला संघाची खेळाडू तेजल हसबनीस, आयकॉन खेळाडू ईश्वरी अवसारे, सपोर्ट स्टाफ तसेच जिल्हा संघटनेचे इतर पदाधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांची पंचायत राज्य समितीवर निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर/प्रतिनिधी : काल विधान भवन , मुंबई येथे मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत सन २०२४-/२५ वर्षासाठीच्या महाराष्ट्र विधान मंडळाच्या सर्व समित्यांची निवड करण्यात आली.

राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, विधानसभेचे अध्यक्ष यांनी आमदार डॉक्टर भाई बाबासाहेब देशमुख यांची पंचायत राज समिती व निवड करून त्यांना काम करण्याची संधी दिल

स्थानिक ग्रामीण स्वराज्य संस्था असून की ग्रामपंचायत पंचायत समिती आणि जिल्हा परिषद यांच्या कार्यप्रणाली, धोरणे आणि अंमलबजावणी यांचा अभ्यास करण्याची संधी या निमित्ताने आमदार बाबासाहेब देशमुख यांना मिळणार आहे.

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा जयंती निमित्त भव्य सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन**

**शहरातून काढण्यात आली वधू-वरांची वरात**

# शिव-बसव-डॉं.बी.आर.आंबेडकर मागासवर्गीय बहु.सामाजिक संस्थेच्या वतीने १३ झोडप्यांचे सामुदायिक विवाह सोहळा संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनीधी : अक्कलकोट तालुकामधील शिव बसव डॉं.बी.आर.आंबेडकर मागासवर्गीय बहुउद्देशीय सामाजिक संस्था अक्कलकोट संस्थापक अध्यक्ष संदिप भाऊ मडिखांबे यांचा संकल्पनातून या सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.दर वर्षी महामानव डॉं.बाबासाहेब आंबेडकर यांचा जयंती निमित्त भव्य सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन करतात. यंदा संस्थेचा ८ वे सामुदायिक विवाह सोहळा संपन्न झाला.या सामुदायिक विवाह सोहळ्यात १३ झोडप्यांने विवाहबध्द झाले.संस्थेचे मार्गदर्शक




विनोद थोरे सर यांनी आपल प्रास्ताविकेत म्हणाले की वाढती महागाई, रितीरिवाज, हुंडा, मानपान, कर्जबाजारीपणा आणि नोटबंदी व कोरोना महामारी अशा संकटावर मात करण्यासाठी आमच्या संस्थेने हा स्तुत्य उपक्रम हाती घेतला आहे. गेल्या ०७ वर्षात १२९ जोडप्यांचे विवाह यशस्वीपणे संपन्न झाले आहेत. वर्ष ०८ वे मध्ये १३ झोडप्यांचे



विवाहबध्द होत आहे.या विवाहात वधु-वरांना मणी मंगळसूत्र, जोडवे, हार -गुच्छ, वधूस - विधीची साडी, शालू, सँडेल. वरास - विधीचा पोशाख, सूट, बूट, कोट, संसारोपयोगी भांडे(प्रत्येकी ५ नग), खाट, गादी, कपाट इत्यादी वस्तू देण्यात आले आहेत.व कन्यारत्न प्राप्त झाल्यास संस्थेतर्फे रू.३०००/- फिक्स डिपॉंजीट ठेव वयाच्या १८ वर्षापर्यंत ठेवण्यात येईल.१ वर्षाचा ३ लाख रूपयांचा अपघात विमा उतरवण्यात येईल.विवाह दिनांक २० मे २०२५ रोजी प्रियदर्शनी मंगलकार्यालय येथे सायंकाळी ०५.३० वाजता ठेवला होता.त्यापूर्वी वधू - वरांचे अक्कलकोट शहरातून वरात काढण्यात आले. प्रिती भोजन सकाळी १० वाजेपासून प्रियददर्शनी मंगलकार्यालय, एवन चौक अक्कलकोट येथे सूरु होता.विवाह सोहळा बौध्दाचार्य मरेप्पा शिवशरण सर यांनी बौध्द धर्म पध्दतीने करण्यात आले. या नवदांपत्यस शुभ आशिर्वाद देण्यासाठी तालुक्यातील सर्वधर्मीय प्रमुख मान्यवर उपास्थित होते.व वधू वरांचे नातेवाईक पाहुणे मंडळीही मोठ्या संख्यांने उपास्थित होते.संस्थेचा वतीने ज्यांनी ज्यांनी या सामुदायिक विवाह सोहळ्यास सहकार्य मदत केले असे संस्थेचे सर्व आजी माजी पदाधिकारी, कार्यकर्ते, मार्गदर्शक, संदिप भाऊ मडिखांबे मित्र परिवर यांनी अथक परिश्रम घेतले त्यांचे ही आभार या विवाह सोहळा समिती २०२५ चे अध्यक्ष विकास भाऊ गायकवाड यांनी आभार मानले.